# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.03.2026** **वार- शनिवार**

---

**गारपीट**

पुणे जिल्ह्यात अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि काही भागांत झालेल्या गारपिटीमुळं मागील दोन ते तीन दिवसांत रब्बी हंगामातील काढणीच्या अवस्थेतील गहू आणि हरभरा पिकाचं नुकसान झालं आहे. याशिवाय कांदा, भाजीपाला, फुलपिके आणि फळबागा मिळून 844 हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. अवकाळी पावसामुळे सर्वाधिक नुकसान पुरंदर तालुक्यात झाल्याचं त्यांनी सांगितलं. एकंदर सहा तालुक्यांतील 2 हजार 347 शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झाले आहे.

**थकबाकी**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेनं 25 वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या थकीत कर्जप्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी 'दीर्घ प्रलंबित थकबाकी निवारण योजना 2026' जाहीर केली आहे.  बँकेनं नव्या योजनेची अंमलबजावणी करताना दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या कर्जप्रकरणांचा परिणामकारक निपटारा करण्यावर भर दिला आहे अशी माहिती बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी दिली.

**प्रस्ताव**

उरूळी देवाची इथला 500 मेट्रिक टन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विनानिविदा देण्याचा प्रस्ताव महापालिकेने मागं घेतला आहे. आता हा प्रकल्प निविदा काढूनच दिला जाणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. शहरात दररोज सुमारे २३०० ते २४०० मेट्रिक टन कचरा निर्माण होत असल्यानं प्रक्रिया प्रकल्पांची गरज वाढली आहे. मात्र, विनानिविदा काम देण्यावर विरोध झाल्यानंतर महापालिकेने निर्णय बदलला असं त्यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केलं.

**शेट्टी**

शेतकरी सन्मानाचा, प्रतिष्ठेचा विषय होत नाही, तोवर आमचा लढा आणि संघर्ष सुरूच राहील असं मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी पुण्यात व्यक्त केलं. सरहद पुणे आणि कृष्णा पब्लिकेशन यांच्या वतीनं आयोजित शहीद भगतसिंह यांच्या पुतणीनं लिहिलेल्या 'युगदृष्टा भगतसिंह आणि त्यांचे मृत्युंजयी पूर्वज' या भगतसिंह यांच्या अधिकृत जीवनचरित्राचं प्रकाशन आणि  शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या राजू शेट्टी यांना 'युगदृष्टा भगतसिंह राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. शेतीव्यवसायात बुवाबाबांचा शिरकाव, मंत्रतंत्राचा वापर चीड आणणारा असल्याचं सांगून राजू शेट्टी यांनी मंत्रा-तंत्रानं शेती यशस्वी झाली असती, तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असत्या का? असा प्रश्नही उपस्थित केला.

**अभय**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं अभय योजना लागू केल्यापासून २० दिवसांमध्ये २७ हजार ८४० मालमत्ता कर थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. ही योजना ३१ मार्चपर्यंत सुरू राहणार असल्याचं डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी सांगितलं आहे.

आतापर्यंत ८० कोटीहून अधिक रक्कम जमा झाली आहे. योजनेअंतर्गत थकबाकीदारांना १९ कोटी १५ लाख रुपये सवलत देण्यात आली आहे.

**सिंधी**

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील आबालवृद्धांनी 'चेटीचंड' महोत्सवात सहभागी होत सिंधी समाजाच्या एकतेचं दर्शन घडवलं. सिंधी समाजाचे नवीन वर्ष आणि भगवान साई झुलेलाल यांच्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे या महोत्सवाचं आयोजन केलं होतं.

**सत्कार**

टीचर्स असोसिएशन फॉर नॉन एडेड पॉलिटेक्निक्स संघटनेतर्फे विधीज्ञ सुरेश पाकळे यांचा कृतज्ञता सन्मान माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या हस्ते आज पुण्यात करण्यात आला. विधीज्ञ सुरेश पाकळे यांनी कधीही पैशाला आपलं सर्वस्व न मानता पिडित शिक्षक, कामगार, फेरीवाले यांना न्याय मिळवून देण्याचं कार्य केलं अशा शब्दांत न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी त्यांचा गौरव केला. तर समाजात ज्या घटकांचे आवाज ऐकले जात नव्हते, ज्यांना न्यायाची आवश्यकता होती त्यांना न्याय मिळवून देताना न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी वेळोवेळी मदत केली अशी कृतज्ञता पाकळे यांनी व्यक्त केली.

**निधन**

पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते शैलेश काळकर यांचं काल पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते 55 वर्षांचे होते. विश्व हिंदू परिषद, स्वातंत्र्यवीर सावरकर ट्रस्ट आणि हिंदू संघटनांच्या माध्यमातून त्यांनी समाजकार्यात सहभाग घेतला ट्रॅव्हल टाईम मोबिलिटी सर्विसेसच्या माध्यमातून अनेकांना रोजगार देण्याचं काम त्यांनी केलं.

**कुस्ती**

वाघोलीत ६८ वी महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा सुरू आहेत. राज्य अजिंक्यपदासाठी माती आणि गादी विभागातील अंतिम लढती पार पडल्या. माती विभागात ५७ किलो वजनगटात कोल्हापूर जिल्ह्याचा मृणाल पाटील अव्वल आला तर पुणे शहराच्या ओंकार निगडे याला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.
७९ किलो आणि ८६ किलो गटात सोलापूर जिल्ह्याचे बिरुदेव बनसोडे आणि बच्या मशीद शेख यांनी प्रथम क्रमांक मिळवला. गादी विभागात ६१ किलो ८६ किलो गटात कोल्हापूरचे वैभव पाटील आणि अभिषेक कापडे यांनी बाजी मारली. आज रात्री महाराष्ट्र केसरी किताबी लढतींची उपांत्यपूर्व फेरी पार पडणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**